**सुभाषित -**

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चन्दनं चारुगन्धं |

छिन्नं छिन्नं पुनरपि पुन: स्वादु चैवेक्षुकाण्डम् |

दग्धं दग्धं पुनरपि पुन: कांचनं कान्तवर्णं ।

प्राणन्तेऽपि प्रकृतिविकृतिर्जायते नोत्तमानाम् ‖

**अर्थ -**

पुन्हा पुन्हा कितीही उगाळले तरी चंदनाचा वास गोड तो गोडच. पुन्हा पुन्हा तोडला तरी ऊसाची चव गोड ती गोडच. पुन्हा पुन्हा तापवले तरी सोन्याचे सुंदर तेज कायमच. त्याप्रमाणे सज्जन माणसांचे प्राण गेले तरी आपला मूळ स्वभाव ते बदलत नाहीत.